# प्रसिध्दी पत्रक

**श्री. जब्बार सत्तार पठाण, वय ४४ वर्षे, पद पोलीस पाटील, बोलठाण ता. गंगापुर, जि.औरंगाबाद हे २०,०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. जब्बार सत्तार पठाण, वय ४४ वर्षे, पद पोलीस पाटील, बोलठाण, ता. गंगापुर, जि.औरंगाबाद. |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक ०४/०९/२०१८ रोजी याबा चहाची हॉटेल जवळ, हडको कॉर्नर औरंगाबाद येथे |
| लाचेची रक्कम | :- | २०,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | गुन्हा दाखल न करणेबाबत पोलीसांना सांगून प्रकरण मिटविण्यासाठी |

यातील तक्रारदार यांचे बहिनीचे पतीने आत्महत्या केली असून, त्याबाबत पोलीस ठाणे शिल्लेगाव, औरंगाबाद ग्रामीण येथे अकस्मात मृत्यु प्रकरण दाखल आहे. सदर प्रकरणात तक्रारदार व त्यांच्या बहिनीवर आत्महत्तेस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल न करणेबाबत शिल्लेगाव पोलीसांना सांगून प्रकरण मिटविण्यासाठी श्री. जब्बार सत्तार पठाण, पोलीस पाटील बोलठाण, ता. गंगापुर, जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदाराकडे ३०,०००/- रु लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची पोलीस पाटील श्री. जब्बार पठाण यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०३/०९/२०१८ रोजी श्री. जब्बार सत्तार पठाण, वय ४४ वर्षे, पद पोलीस पाटील, बोलठाण, ता. गंगापुर, जि.औरंगाबाद, यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणी बाबत पडताळणी केली असता, पोलीस पाटील श्री. जब्बार पठाण यांनी तक्रारदार यांच्याकडे ३०,०००/- रुपयाची लाचेची मागणी करून तडजोडी अंती २०,०००/- रु रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.०४/०९/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला असता, श्री. जब्बार सत्तार पठाण, वय ४४ वर्षे, पद पोलीस पाटील, बोलठाण, ता. गंगापुर, जि.औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारा समक्ष २०,०००/- रुपये लाचेची रक्कम याबा चहाची हॉटेल जवळ, हडको कॉर्नर, औरंगाबाद येथे तक्रारदाराकडून स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४

Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(वर्षाराणी पाटील)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.